**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.4** **March – April 2024**

# भारतीय लोकशाही पुढील समकालीन समस्या व आव्हाने

**प्रा. नकुल पोपट खवले**
*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग*
*श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा*
***Corresponding Author - प्रा. नकुल पोपट खवले***
**DOI - 10.5281/zenodo.10951998**

**गोषवारा :**

*भारताने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केला आहे. सत्ताविभाजनाच्या सिद्धांताप्रमाणे शासन यंत्रणा मुख्यत: तीन भागांमध्ये विभागलेली असते. हे तीन भाग म्हणजे कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ. या सिद्धांताप्रमाणे लोकांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि लोकशाही कारभार सुकर करण्यासाठी, हे तीन विभाग स्वतंत्र असले पाहिजेत. राज्यघटना लागू केल्यानंतर भारतामध्ये संसदीय राजवटीची सुरुवात झाली. संसदीय राज्यव्यवस्थेमध्ये संसद किंवा कायदेमंडळ प्रधान असते आणि सरकार संसदेच्या कनिष्ठ सभागृहाला जबाबदार असते. भारतीय राज्यघटनेने सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांना व्यापक अधिकार दिले. सर्वोच्च न्यायालय घटनापीठ म्हणून काम करते. त्याला पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. त्यानुसार सर्वोच्च न्यायालय संसदेने संमत केलेला कायदा घटनात्मकदृष्ट्या योग्य आहे का नाही, याची तपासणी करते. संसदीय मार्गाने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होतो आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेत होत असलेला हा बदल अतिशय चिंताजनक आहे. लोकशाहीची वाढ ही तिच्या अंगभूत सक्रीयतेतून होणे अपेक्षित असते. पण आज लोकशाहीला कृत्रिम ठरवण्याचा प्रयत्न होतो आहे. भारतीय राज्यघटना आणि राजकारण यांचा लोकशाही केंद्रबिंदू आहे. आज लोकशाही मार्गाने निवडणुका होत असल्या तरी कारभार मात्र हुकूमशाही आणि एकचालकानुवर्तीत्वाची जोपासना करताना दिसत आहे. भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, संघराज्यीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही ही मूलभूत तत्वे म्हणून समाविष्ट केली आहेत. मात्र या प्रत्येक मूल्याचे बाहेरून गुणगान गात त्याला आतून तडे देण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होताना दिसत आहे. स्वातंत्र्याचा अर्थ स्व -तंत्र असा घेतला जातो आहे. आपले म्हणणे पुढे रेटत दुसऱ्याच्या अधिकाराचा संकोच केला जात आहे. सार्वभौमत्वामध्ये अंतिम सत्ता लोकांची असते. मात्र आज लोकांना फक्त गृहीत धरले जात आहे. संघराज्यीय एकात्मता हे तत्व केंद्र राज्य संबंधाच्या तणावातून आज अडचणीत आणले जात आहे. धर्मनिरपेक्षतेचे ऐवजी धर्मराष्ट्राचा डंका पिटला जात आहे. मानवी कारुण्यावर नव्हे तर आर्थिक समतेवर आधारित समाजवादाच्या संकल्पनेऐवजी कमालीच्या विषमतावादी भांडवलशाहीचा पुरस्कार केला जात आहे. लोकशाही अत्यंत पद्धतशीरपणे हुकूमशाहीच्या मार्गाने नेली जात आहे. ही आव्हाने भारतीय राज्यघटनेसमोरील*

*पर्यायाने या देशाचा लोकांसमोर उभी आहेत. याचाच अर्थ ही सर्व आव्हाने भारतीय लोकशाही समोरील आहेत. लोकशाही आव्हानांच्या विळख्यात अडकली आहे.*

***बीज संज्ञा ( Key Word): संघराज्य , राजकीय गुन्हेगारीकरण , सत्ता विभाजन , न्यायालयीन पुनरावलोकन***

**प्रस्तावना:**

भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीस २६ जानेवारी १९५० रोजी सुरुवात झाली. गेली ७१ वर्षे भारतीय जनतेने घटनेच्या प्रास्ताविकात नमूद केलेली तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला घटना निर्मितीच्या वेळी सर्व राजकीय पक्षांनी त्यास पाठिंबा दिलेला नव्हता. समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, हिंदुमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा या प्रक्रियेला विरोध होता; परंतु आज सर्वच राजकीय पक्ष राज्यघटनेची अधिमान्यता स्वीकारत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील अनेक देशांमध्ये घटना बदलल्या. जर्मनी, फ्रान्स, रशिया, चीन इत्यादी देशांमध्ये नव्या घटना बनविण्यात आल्या. गेली ७१ वर्षे समाजात होत असणाऱ्या बदलांना सर्जनशील प्रतिसाद देत, भारतीय राज्यघटनेने आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे. गेल्या ७३ वर्षांमध्ये भारतीय समाजात मोठे बदल झाले. मुळात घटनादुरुस्ती करणे अवघड असतानाही, राजकीय पक्षांनी लवचिक भूमिका स्वीकारत, संसदेद्वारे मोठ्या प्रमाणात घटना दुरुस्ती केल्या. आजपावेतो आपल्या घटनेमध्ये जरी शंभरापेक्षा जास्त वेळा दुरुस्ती झालेली असली, तरी त्यामुळे तिची अधिमान्यता कमी झालेली नाही; कारण या दुरुस्ती सामाजिक बदलाची प्रक्रिया सुगम करण्यासाठी गेल्या गेल्या होत्या. भारतीय राज्यघटना सातत्याने सामाजिक न्याय आणि लोकशाही यांना जास्तीत जास्त खोलवर नेण्याचा प्रयत्न करीत आहे आणि गेल्या ७३ वर्षांत निर्माण झालेल्या अनेक झंझावातांना तिने यशस्वीपणे तोंड देऊन, लोकशाही मार्गाने परिवर्तन करण्याची प्रक्रिया गतिमान केलीआहे.भारताने संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. आज त्याच लोकशाहीचे गुणगाण गात आज लोकशाहीची परवड चालू आहे. त्याचे एक कारण सत्ताधाऱ्यांची मनमानी हे जसे आहे तसेच निवडणूक कायद्यातील उणिवा हेही आहे. लोकशाहीच्या महत्त्वाच्या पैलूंच्या प्रबोधनाचा अभाव आहे. अर्थात हे सारे असले तरीही आपण स्वीकारलेली संसदीय लोकशाही पद्धत हीच सर्वाधिक लोकाभिमुख आहे यात शंका नाही. कारण ती सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांचा माज उतरवते. हा इतिहास आहे. अर्थात त्यामध्ये मताधिकार यंत्र आणि यंत्रणेत घोटाळेबाजी अपेक्षित नसते. महात्मा गांधींनी एकदा म्हटलं होतं, "हुकूमशाहीत दमनाची भीती असते तर लोकशाहीत प्रलोभनाची भीती असते". आज लोकशाहीला दमन आणि प्रलोभन या दोन्हीचाही धोका जाणवतो आहे. वास्तविक आपण राजेशाही,

साम्राज्यशाही घालवून लोकं शक्तीच्या बळावर लोकशाही प्रस्थापित केली आहे. म्हणून हे राष्ट्र प्रजासत्ताक नव्हे तर 'लोकसत्ताक' आहे. 'जिथे राजा तिथे प्रजा असते'. लोकशाहीमध्ये लोकांची सत्ता असते. सत्तेचे अंतिम मालक लोक असतात. निवडून गेलेली मंडळी कारभारी असतात हे गृहीत आहे. कारभारी चुकले तर त्याला मालक जाब विचारू शकतो. मात्र आज निवडून दिलेली कारभारी मंडळी मालकाप्रमाणे, राजाप्रमाणे, हुकूमशहाप्रमाणे वागू लागले आहेत. हे लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे.

लोकशाही मार्गाने होणाऱ्या निवडणुकीत सुद्धा निवडणूक आणि खर्च यांचे प्रचंड प्रमाण वाढले आहे. परिणामी काळा पैसा व गुन्हेगारी यांचं साटंलोटं दिसत आहे. परवा झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांना वस्तूंच्या मोफततेची अमिषे तर दाखवण्यात आलीच. मात्र 'रोखीने खात्री वाढते', ही नवी म्हण कुजबुजत काम करत मतदारनिहाय पाचआकडी व कार्यकर्ता निहाय सहाआकडी रक्कमा वाटल्या गेल्याच्या सूरस चर्चा रंगल्या आहेत. पूर्वी उमेदवारांना गुन्हेगार सहकार्य करायचे. मात्र आता गुन्हेगार असलेल्या उमेदवारांचे प्रमाण धक्कादायक पद्धतीने वाढत आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे :**

१. भारतीय संघराज्य लोकशाहीचा अभ्यास करणे.
२. संघराज्य लोकशाहीपुढील आव्हाने जाणून घेणे.

**संशोधन विषयाची गृहीतके:**

१. भारतीय संघराज्य लोकशाही पुढे मानव निर्मित आव्हाने आहेत.
२. भारतीय संघराज्य लोकशाही पुढे काही संस्थात्मक आव्हाने निर्माण झाली आहेत.

**भारतीय संघराज्य लोकशाहीपुढे निर्माण झालेली आव्हाने पुढीलप्रमाणे:**

**राज्यघटनेच्या मूलभूत तत्वांना आव्हान:**

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशक राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या चार मूल्यांचा उद्घोष केला. महात्मा गांधी, पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार त्या दृष्टीने महत्त्वाचे होते. सध्या या चारही मूल्यांना आव्हान मिळत आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाऐवजी, सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला जात आहे; ज्याचा आत्मा हिंदुत्वविचार हा आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी संमत केलेला नागरिकत्व सुधारणा कायदा हा धर्मनिरपेक्षतेच्या विरुद्ध होता; कारण त्यामध्ये एका धर्माचा लोकांना वगळण्यात आले होते. भाजप शासित काही राज्यांनी 'लव्हजिहाद'बाबतचे कायदे करून, धर्मस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या विरुद्ध पाऊल उचलले आहे. गोहत्या निवारक कायदे संमत केल्यामुळे, अनेकांची उपजीविका धोक्यात आली आहे आणि गोरक्षकांचे समूह काही ठिकाणी निरपराध लोकांची हत्या करीत आहेत. सर्वसमावेशक आणि सामाईक राष्ट्रवादाची खिल्ली उडवली जात आहे.

उदारमतवादी विचारांना क्षुल्लक ठरवून, आक्रमक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला जात आहे. नवउदारमतवादाच्या काळात समाजवादी कल्पना तेवढीशी लोकप्रिय राहिली नसली, तरी सामाजिक समता, सामाजिक न्याय, सत्तेचे आणि संपत्तीचे न्याय्य वाटप या घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ग्रथीत केलेल्या विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही. आज देशामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता असून, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मांडण्यात आलेल्या राजकीय तत्त्वज्ञानाचे संरक्षण करण्याचे मोठेच आव्हान आज आपल्यासारख्या नागरिकांसमोर आहे.

**पंतप्रधानाची एकाधिकारशाही :**

भारत ही संसदीय लोकशाही आहे आणि या व्यवस्थेत पंतप्रधान हा लोकसभेचा, शासन यंत्रणेचा आणि सत्ताधारी राजकीय पक्षाचा प्रमुख असतो. या व्यवस्थेत सामूहिक जबाबदारीचे तत्त्व महत्त्वाचे असते. आघाडीच्या सरकारांच्या काळामध्ये पंतप्रधानांचे काम बरेचसे कमजोर होते; परंतु आता २०१४नंतर पंतप्रधानांचे पद शक्तीशाली बनले आहे. त्यांचे कार्यालय सर्व सत्तेचे केंद्र बनले असून, कार्यकारी मंडळाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या व्यवस्थेमध्ये पंतप्रधानांनी विविध पक्षांशी आणि गटांशी चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षित असते; परंतु २०१९पासून ३७० कलम रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, तलाकविरुद्धचा कायदा किंवा शेतीविषयक तीन कायदे घाईने अमलात आणण्यात आले; त्यामुळे देशभर लोकांच्या चळवळी उभ्या राहिल्या. लोकशाही राजवटीत चर्चा करून, सहमती निर्माण करून, राज्य चालविणे अपेक्षित आहे. लोकशाहीची ही मूल्ये जतन करून, देशाचा कारभार करण्याचे मोठेच आव्हान आपल्या समोर आहे. संसदीय व्यवस्थेमध्ये संसद सर्वांत महत्त्वाची असते; कारण केंद्र सरकार लोकसभेला जबाबदार असते. सर्व कायदे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा करून संमत केले जातात. विरोधी पक्ष सरकारच्या काही धोरणांविषयी टीका करून, सरकारला धारेवर धरू शकतात. आता संसदेची पहिली शान राहिलेली नाही. अधिवेशनाचा कालावधी कमी होत आहे. चर्चेला कमी वेळ मिळतो आहे आणि सरकार घाईघाईने कायदे संमत करून घेत आहे. जम्मू-काश्मिरचे विभाजन करण्याचा कायदा व वर उल्लेख केलेले इतर कायदे घाईनेच संमत करण्यात आले. संसदीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे कायदे संमत करण्यापूर्वी, ते संसदेच्या विषय समितीकडे चिकित्सा करण्यासाठी पाठविले जातात; त्यामुळे कायदे निर्दोष बनण्यास मदत होते. वरील महत्त्वाचे कायदे मात्र या समितीकडे गेले नाहीत. पं. नेहरू, इंदिरा गांधी, नरसिंह राव आणि वाजपेयी हे पंतप्रधान संसदेमध्ये उपस्थित राहून, कामकाजात हिरीरीने भाग घेत असत आणि सरकारची बाजू मांडत असत; परंतु उत्तम वक्ते असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी तेवढ्या गंभीरपणे कामकाजात भाग घेताना दिसत नाहीत. जुन्या काळामध्ये अल्पमतात असूनही विरोधी पक्षांचे नेते सरकारला धारेवर धरत

असत. सध्या विरोधी पक्षांची कामगिरी कमी दर्जाची आहे. आता संसदेला तिचे महत्त्व प्राप्त करून देण्याची गरज आहे.

**स्वतंत्र व निपक्ष न्यायालय:**

न्यायालय हे आपल्या राज्यव्यवस्थेतील महत्त्वाचे अंग आहे. गेल्या ७१ वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनेक महत्त्वाच्या बाबींमध्ये लोकांच्या अधिकारांचे संरक्षण केले. त्यांना व्यापक बनविले. गेल्या काही वर्षांत न्यायालयाचे काही निर्णय वादग्रस्त ठरले आहेत. अनेक बाबींमध्ये लोकांच्या दृष्टीने जे निकडीचे प्रश्न आहेत, ते सुनावणीस घेतलेले नाहीत. रामजन्मभूमी संबंधीचा निर्णय वादग्रस्त ठरला. त्याच प्रमाणे जम्मू-काश्मिरच्या संबंधात करण्यात आलेली घटनादुरुस्ती, कायदे, नागरिकत्व सुधारणा कायदा आणि व्यक्तिस्वातंत्र्याबाबत न्यायालयाने ज्या तातडीने सुनावणी करणे आवश्यक होते, ते त्यांनी केले नाही. आज देशात ज्या प्रमाणे मोठ्या प्रमाणात वैचारिक ध्रुवीकरण झाले आहे, त्याचे पडसाद न्यायालये आणि बार कौन्सिलच्या कामगिरीवर पडत आहेत. तरीही इतर सर्व संस्थांपेक्षा सर्वोच्च न्यायालयाची कामगिरी सरस आहे. सर्वोच्च न्यायालयाने सत्ताविभागणीचे तत्त्व अंगी बाळगून. आपली निष्पक्षता कायम ठेवून कार्य करावे अशी सर्वांचीच अपेक्षा आहे.

भारतीय संघराज्य व्यवस्थेला सर्वांत मोठा धक्का केंद्र सरकारने ३७० व ३५ ब ही कलमे रद्द करून, जम्मू-काश्मिरचे विभाजन करून आणि एका स्वायत्त राज्याला केंद्रशासित प्रदेश बनवून दिला आहे. यावेळी जुन्या सरकारने दिलेली आश्वासने, घटनात्मक तरतुदी आणि लोकांची इच्छा यांना हरताळ फासण्यात आला. गेल्या सहा वर्षांच्या काळामध्ये अधिक विकेंद्रिकरण होण्याऐवजी जीएसटीसारख्या कायद्यामुळे, सत्तेचे केंद्रिकरण होत आहे. निवडणूक आयोग आणि इतर स्वायत्त संस्थादेखील पहिल्यासारख्या स्वतंत्र बुद्धीने काम करताना दिसत नाहीत. लोकपाल या संस्थेने अजून म्हणावे तसे काम केलेले नाही.

**मतदारांची उदासीनता :**

निवडणुकीद्वारे लोकांना सत्ता बदल किंवा आपले प्रश्नांची सोडवणूक कोणता राजकीय पक्ष अथवा उमेदवार सोडवू शकतो हे ठरविण्याची योग्य वेळ असते. अशा वेळी लोक मतदानाकडे लोक दुर्लक्ष करतात. ज्याप्रमाणे जशी जनता तशी शासन व्यवस्था ही म्हण योग्य ठरते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदारांची ही भूमिका अतिशय महत्वाची ठरते. मतदान करण्याची उदासिनता लोकशाही देशाला मारक ठरतेच; शिवाय सर्वांगिण प्रगतीचे घोडे इथे अडते. ग्रामपंचायत ते लोकसभा. कुठलीही निवडणूक असो; चाळीस पन्नास टक्के मतदान होणं ही काही निवडणुकीची यशस्वी प्रक्रिया म्हणता येणार नाही. यासाठी मतदारांनी मतदानादिवशी सुट्टी साजरी न करता मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे.

संसदीय लोकशाहीमध्ये लोकांनी मतदान करायचे नसते. तर ‘मताधिकार’ बजावायचा

असतो. मत ही दान द्यायची वस्तू नाही, तो आपला अधिकार आहे. आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात झालेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीतही सरासरी ६० टक्के लोकांनी मताधिकार बजावला. सहकारी संस्थांच्या निवडणुका ९० ते १०० टक्के मताधिकार बजावला जातो. पण विधानसभा- लोकसभा निवडणुकीत ते का होत नाही? याची कारणे शोधून त्या कारणांचे निराकरण करणे हे लोकशाही समोरील आव्हाने आहे. दुर्जनांच्या क्रियाशीलतापेक्षा सज्जनांची निष्क्रियता आज मोठी आहे. निवडणूक उमेदवार केंद्रित नव्हे तर मतदार केंद्रित झाली पाहिजे. राजकीय पक्षांचे जाहीरनामे ठीकच पण मतदारांचा जाहीरनामा हवा. त्यावर चर्चा झाली पाहिजे. मतदार जेवढा जागरूक तेवढी लोकशाही सक्षम होऊ शकते.

**घटनात्मक संस्थाची गळचेपी:**

भारतीय घटनेने लोकशाही प्रक्रिया सुरळीत पार पाडावी यासाठी अनेक संस्थाची निर्मिती केली. निवडणूक आयोग, वेगवेगळ्या वित्तीय संस्था यांचा वापर अलीकडे सरकार मार्फत मोठा हस्तक्षेप केला जात.आहे. परंतु या भयमुक्त व नि:पक्षपाती वातावरणात निवडणुकांचे संचलन होणे ही लोकशाहीची पूर्वअट आहे. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवन-व्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्य व्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणुका हे असते. निवडणुकांमधून लोकांनी दिलेला कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो. त्यामुळे प्रभावी निवडणूक यंत्रणा ही प्रातिनिधिक शासनाची आधारशिला असते. भारतीय लोकशाही ही चार खांबावर लोकशाही समर्थपणे उभी आहे. असे मोठ्या अभिमानाने सांगितले जाते. यास मा.न्यायमूर्तींनी घेतलेली पत्रकार परिषद व त्यातून भारतीय लोकशाही कशी धोक्यात आहे याचा केलेला उच्चार यातून न्याय प्रक्रियेत ही सरकार हस्तक्षेप करीत आहे हे दिसते. आता त्यात समाजमाध्यमांची भर पडली आहे. आता सध्याचे तर चित्र असे आहे की, हे सर्व खांब एकाच व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या नियंत्रणात आहेत. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे सरकारच्या निर्णय निर्धारणासंबंधी टीका केली तर त्यांना सरकारच्या रोषास सामोरे जावे लागते.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण:**

राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाबद्दल सार्वत्रिक चिंता व्यक्त केली जात असली, तरी याला आळा बसणार कसा, हा मोठा प्रश्न आहे. निवडून येण्याची क्षमता किंवा सत्तेच्या समीकरणात संख्याबळाला महत्त्व असल्याने राजकीय पक्ष खाका वर करतात. वास्तविक राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्याची जबाबदारी ही राजकीय पक्षांची. पण सत्तेसाठी राजकीय पक्ष वा नेते कोणत्याही थराला जातात, ते पाहता राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षा करणेच चुकीचे ठरेल. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत २३३ विजयी उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल होते. यांपैकी १५९

म्हणजेच लोकसभेतील तब्बल २९ टक्के खासदारांच्या विरोधात खून, बलात्कार, चोरी, दरोडे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. ‘एडीआर इंडिया’ या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या पाहणीत, लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये गुन्हेगारी पाश्र्वभूमी असलेले उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण प्रत्येक निवडणुकीत वाढतच असल्याचे आढळून आले आहे. हा कल तर अधिकच चिंताजनक. राजाभय्या, अतिक अहमद, पप्पू यादव, शहाबुद्दीन, फुलनदेवी, अरुण गवळी, पप्पू कलानी यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेले दरोडेखोर किंवा गुंड निवडून येतात. या गुन्हेगारांची आपापल्या विभागांमध्ये एवढी दहशत असते, की कोणी विरोध करण्यास धजावत नाही. निवडून येण्याची क्षमता या एकाच निकषावर राजकीय पक्ष या गुन्हेगारांचे सारे गुन्हे दुर्लक्षून त्यांना उमेदवारी देतात. कोणताही राजकीय पक्ष असो, गुन्हेगारांना रोखण्याकरिता किंवा त्यांना उमेदवारी देणार नाही म्हणून पावले उचलण्याची शक्यता कमीच. राजकीय पक्ष किंवा नेत्यांकडून अपेक्षाच नाही आणि न्यायसंस्थाही खंबीर भूमिका घेताना दिसत नाही. त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखणार तरी कोण, हा प्रश्न अनुत्तरितच राहणारा आहे.

**धार्मिक उन्मादी राजकारण:**

धार्मिक उन्मादामुळे एक नवे राष्ट्र जन्मू शकते असा भारतीय इतिहास सांगतो. आपल्या भारतीय उपखंडात महागाई, बेरोजगारी, भाववाढ यावरून लोकांचे लक्ष उडविण्याचा सोपा मार्ग असतो, तो म्हणजे धर्म धोक्यात आल्याची आवाई उठविणे. तसे केले की, समाज दोन गटांत विभागला जातो. एक धर्मवादी आणि दुसरे धर्मविरोधी. त्यामुळे समाजाचा शत्रू कोण आहे ते स्पष्ट होते. एकदा शत्रू कोण आहे हे स्पष्ट झाले की, झोडपायला कुणीतरी उपलब्ध होते. आर्थिक सुधारणा करता आल्या नाहीत तरी हरकत नाही. धार्मिक सुधारणा करता येतात की! गाय ही पूर्वापार पवित्र आहेच. इतके सुलभ धार्मिक प्रतिक दुसरे कोणतेच नाही. अगदी गांधीजीही गायीला पवित्र मानीत. त्यामुळे संसदेत आर्थिक सुधारणा मंजूर करून घेता आल्या नाहीत तरी गायीच्या हत्येला बंदी घालता येते. त्याला विरोध करण्याची विरोधी पक्षांचीही हिंमत होत नाही. कारण त्यांचेही राजकारण अशा धार्मिक प्रतिकांमध्येच अडकलेले असते. गोहत्येला बंदी केली की, गायीची पूजा करणारे देशभक्त ठरतात आणि गायीची हत्या करणारे देशद्रोही. राजकारणाला जेव्हा समाजाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविता येत नाहीत तेव्हा समाजापुढे आभासी असे धार्मिक प्रश्न निर्माण केले जातात.

**समाजमाध्यमांचा दुरुपयोग:**

२१व्या शतकाच्या प्रारंभी समाज माध्यमे उदयास आली. आता फेसबुक, यु ट्यूब, ट्वीटर, इन्स्टाग्राम आदी माध्यमांबरोबरच व्हॉट्स ॲप, फेसबुक मेसेंजर, टेलिग्राम आदी जलद संदेश प्रसार (मेसेजिंग) ॲपचा मोठ्या प्रमाणात वापर केला

जातो. निवडणुकीच्या कालावधीत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना आपले विचार मतदारांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे असते. या प्रक्रियेत पूर्वी वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. तथापि, ही माध्यमे तशी एकतर्फी (वन वे) माहिती प्रसाराची आहेत. आता मात्र समाजमाध्यमांची अर्थात सोशल मिडियाची यात भर पडली आहे. याआधीच्या, म्हणजे २०१४मधील निवडणुकांपासून तर समाज माध्यम हे एक अत्यंत प्रभावशाली माध्यम ठरले आहे. हे माध्यम अन्य माध्यमांसारखे एकतर्फी नाही, तर दुतर्फी तसेच परस्परसंवादी स्वरूपाचे आहे. माहिती व तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीनंतर निवडणुकांचा कालावधीमध्ये एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार आणि राजकीय पक्ष समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याचे दिसून येते. निवडणुकीमध्ये अपप्रचार करणे, मतांच्या ध्रुवीकरणास कारणीभूत होईल अशा प्रकारचा दिशाभूल करणारा चुकीचा मजकूर टाकणे, लोकांच्या मनात निवडणूक प्रक्रियेविषयी शंका निर्माण होईल अशा नकारात्मक बाबींसाठीही समाज माध्यमांचा वापर होऊ शकतो. त्यामुळे चुकीच्या व तात्कालिक बाजूने जनमत बदलू शकते हे भारतीय लोकशाही साठी धोक्याची घंटा बनली आहे असे म्हटले तरी वावगे नाही.

**संदर्भसूची:**

१. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुरे , भोळे .ल .भा – नागपूर, पब्लिशिंग कंपनी
२. भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल – वर्चस्व- राजकीय धुरिणत्व- पुणे, डायमंड पब्लिकेशन , प्रकाश पवार
३. वर्चस्व आणि सामाजिक चिकित्सा – पुणे, हरिती पब्लिकेशन , गोपाल गुरु
४. लोकसत्ता संपादकीय – महाराष्ट्र टाइम्स , लेख
५. वायर मराठी प्रसाद कुलकर्णी यांचा लेख –
६. Democracy in India – C.P . Bhambri